जा.क्र./नांवाशमनपा/उद्यान/ /११
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड
दि.

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड**

**अल्पमुदतीचे जाहीर प्रगटण (दुसरी वेळ)**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका क्षेत्रात महात्मा जोतीबा फुले, सावित्री बाई फुले, व छत्रपती राजर्षी शाहु महाराज यांचे पुर्णाकृती पुतळे उभारावयाचे असल्यामुळे तिनही पुर्णाकृती पुतळे ब्रांझधातुमध्ये तयार करुन बसविणे करीता अनुभवी शिल्पकाराकडुन प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.

**: प्रस्ताव व सादरीकरण (प्रझेंटेशन) सादर करणे बाबत नियम व अटी :**

१) मोहरबंद प्रस्ताव हे उद्यान विभाग, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड येथे दिनांक १३.०९.२०११ रोजी सकाळी ०९:०० वाजता सादर करुन शिल्पकराने प्रस्तावासहीत कामाचे सादरीकरण (प्रझेंटेशन) सादर करावयाचे आहे.

२) प्रस्तावासोबत सहाय्यक आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड यांच्या नावे राष्ट्रीय कृत बँकेचे FDR स्वरुपात रु. १०,००० /- इसारा रक्कम भरणे आवश्यक राहील.

३) शिल्पकारास कमीत कमी १० वर्षाचा संबंधीत कामाचाअनुभव तसेच किमान पाच (५) पुर्णाकृती पुतळे तयार करुन बसविण्याचा अनुभव आवश्यक आहे. व या बाबतचा पुरावा सादर करणे बंधनकारक आहे.

४) शिल्पकाराने पुतळयाचे संकल्पीत छायाचित्र सादर करणे बंधनकारक आहे.

५) सादर करण्यात आलेले प्रस्तावांपैकी सुयोग्य प्रस्तावाची निवड करण्याचा अधिकार आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांचे अध्यक्षतेखालील छाननी समितीस राहील.

६) पुतळयाच्या सुयोग्य संकल्पनेस महत्व दिले जाईल.

७) पुतळयाच्या संकल्पनेसोबत नियोजीत पुतळयाची उंची, वजन, रंग यानुसार दर सादर करावे.

८) पुतळा तयार करुन नांदेड येथे आणण्याकरीता वहातुक व इतर खर्च शिल्पकारास करावा लागेल.

९) शिल्पकारास स्थानिक संस्था कराचा व इतर करांचा भरणा करावा लागेल.

१०) पुढील एक वर्षाकरीता पुतळयांची देखभाल व दुरुस्ती शिल्पकाराकडे राहील.

११) शिल्पकारास पुतळयाच्या क्ले मॉडेलला कला संचनालयाची मान्यता प्राप्त करुन घ्यावी लागेल.

१२) प्रथम समयी प्रस्ताव सादर केलेल्या शिल्पकारांनी पुनःश्च प्रस्ताव सादर नकरता केवळ कामाचे उत्तम सादरीकरण सादर करण्यास अनुमती आहे.

१३) कोणतेही कारण न दर्शविता एक किंवा सर्व प्रस्ताव रद्द करण्याचे अधिकार आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांनी राखुन ठेवले आहेत.

**आयुक्त**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

१) संगणक विभाग, यांनी सदर जाहीर प्रगटन महापालिका संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.
२) माहिती व जनसंपर्क विभाग यांनी मुख्य सुचना फलकावर सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द करावे.
३) संपादक, दैनिक....................... यांना सदर जाहीर प्रगटन दि.................... रोजीच्या अंकात प्रसिध्द करुन देयक दोन प्रतित सादर करणेस्तव.

**आयुक्त**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड